१) घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालय व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनामध्ये प्रवेशाकरिता उमेदवाराने संपूर्ण प्रवेश अर्ज निर्धारित तारखेत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL), पुणे यांचे संकेतस्थळावर अथवा मज्ञाम (MKCL) चे अधिकृत ALC केंद्रावरून आवश्यक शुल्कासह ऑन–लाईन भरावा. त्याकरीता महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांच्या संकेतस्थळावर (http://oasis.mkcl.org/agridiploma) संपुर्ण माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तीकेची प्रत व नमुना अर्ज आवश्यक शुल्क भरून "मज्ञाम" च्या अधिकृत ALC केंद्रावरून अथवा "मज्ञाम" चे संकेतस्थळावरुन प्राप्त करावी. प्रवेश अर्जात उमेदवाराने ज्या जिल्ह्याकरीता अर्ज करावयाचे आहे त्या जिल्ह्यातील घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचा व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनांचे विकल्प नमुद करावे. **उमेदवाराने कृषि तंत्र विद्यालय व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनांकरीता दोन्ही मिळून एकच प्रवेश अर्ज भरावा. याकरीता वेगवेगळे अर्ज भरून घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

२) प्रवेशासंदर्भात उमेदवारांनी किंवा उमेदवारांच्या पालकांनी पोष्टाने कुठल्याहीप्रकारचे पत्रव्यवहार विद्यापीठाशी करू नये. प्रवेशाबाबत विद्यापीठाला पोष्टाने पाठविलेले पत्र किंवा कुठल्याही प्रकारची माहिती/चौकशी प्राप्त झाल्यास ते विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्याची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

३) उमेदवाराला संबंधीत जिल्ह्यातील घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात किंवा मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनापैकी पाहिजे असलेल्या कृषि तंत्र विद्यालयात किंवा कृषि तंत्र निकेतनात प्रवेश देतांना प्रवेश अर्जामध्ये नमुद केलेल्या विकल्पावरूनच गुणवत्ता व वर्गवारीनुसार पसंतीचा क्रम ठरविण्यात येईल. म्हणून प्रवेश अर्जामध्ये विकल्प भरतांना काळजीपुर्वक केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तीकेचा अभ्यास करूनच पसंतीच्या कृषि तंत्र विद्यालयाचे किंवा कृषि तंत्र निकेतनांचे क्रम निर्धारित करूनच अर्जात नमुद करावे.

## .३.४ उमेदवारांची निवड ➧

१) ऑन–लाईन भरलेल्या अर्जाची छाननी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांच्या मार्फत होणार आहे.

२) गुणवत्ता यादी वरील तक्रारीवर खालील समिती निर्णय घेईल.

| | | |
|---|---|---|
| १) | अधिष्ठाता (कृषि) | :– अध्यक्ष |
| २) | सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) | :– सदस्य |
| ३) | कुलसचिव | :– सदस्य |
| ४) | अधिष्ठाता (कृषि) यांनी नामनिर्देश केलेले एक सहयोगी अधिष्ठाता | :– सदस्य |
| ५) | उपकुलसचिव (वि.वि.) | :– सदस्य–सचिव |

३) तक्रारी संबंधी तक्रार निवारण समितीचा निर्णय झाल्यानंतर, अधिभारासह गुणवत्ता व वैद्यानिक आरक्षण लक्षात घेऊन हि माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांना e-mail द्वारे कळविण्यात येईल.

४) प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयांकरीता व मान्यताप्राप्त विना अनुदानित कृषि तंत्र निकेतनांकरीता उमेदवारांची प्रवेश यादी त्या त्या जिल्ह्यातील महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या अधिकृत ALC केंद्रांवर तसचे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात सुचना फलकावर एकाचवेळी प्रसिध्द केल्या जाईल.

५) प्रथम, द्वितीय आणि तृतीय फेरीसाठी उमेदवारांची प्रवेश यादी नियमानुसार गुणांचा अधिभार, वैद्यानिक आरक्षण विचारात घेऊन महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांच्या मार्फत प्रसिध्द करण्यात येईल.

६) प्रवेशाबाबत/निवडीबाबत उमेदवारास पोष्टाने कळविण्यात येणार नाही.

## ३.५ प्रत्यक्ष प्रवेश देणे ➧

१) कृषि तंत्र विद्यालयनिहाय व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतननिहाय प्रवेश यादीतील उमेदवारांनी प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालय व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनातील प्रवेशाकरीता त्या त्या जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविणारे संबंधीत घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात स्वतः उपस्थित राहुन विहीत शुल्क भरुन प्रवेश घ्यावा.

२) सर्व फेरी दरम्यान प्रवेश देतेवेळी त्या त्या जिल्ह्यातील घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य व मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनाचे प्राचार्य संबंधीत जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविणा–या घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश प्रक्रियेकरीता पावती पुस्तक घेऊन हजर राहतील.

३) या व्यतिरीक्त विद्यापरिषद व कार्यकारी परिषद, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी यापूर्वी ठरविलेल्या प्रवेश पात्रतेसंबंधीच्या शर्ती, परिनियम तसेच कायम राहतील.

४) घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्यांनी त्यांचे विद्यालयांमार्फत केंद्रीय प्रवेश प्रणालीनुसार त्याचे घटक/संलग्न विद्यालयामध्ये तसेच संबंधीत मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी कृषि तंत्र निकेतनामध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या अंतिम प्रवेश फेरी झाल्याचे तारखेपासून दहा दिवसाचे आत निम्न कृषि शिक्षण कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे.

५) प्रवेशीत विद्यार्थ्याचे विद्यापीठ नामांकनासाठी संबंधीत सर्व कृषि तंत्र विद्यालयांच्या/निकेतनांच्या प्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून नामाकंन अर्ज भरुन संबंधीत माहीती मुळ प्रमाणपत्रासहीत आवश्यक शुल्काचे धनाकर्षक (Demand Draft) सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे काढून त्या कार्यालयामध्ये अंतिम प्रवेश फेरीच्या तारखेपासून दहा दिवसाचे आत सादर करणे आवश्यक आहे.

**३.६ कृषि तंत्र विद्यालयात/निकेतनात प्रवेश मिळविण्याकरीता प्रवेश यादीमधील उमेदवारांनी प्रवेश घेतेवेळी संबंधीत जिल्ह्याच्या प्रवेश प्रक्रिया राबविणारे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश घेतांना उमेदवाराला प्रवेशासाठी आवश्यक कागद पत्रे पुरविणे बंधंनकारक राहील.**

## ३.७ प्रवेशाबाबत राखीव जागांचा तपशिल ➧

उमेदवाराची निवड विहीत केलेल्या राखीव जागा लक्षात घेऊन गुणवत्ता वर्गवारी व शासन निर्णय क्र.टिईअेएम/१५९४/(६३२३)/तांत्रिक शिक्षण–१ दि. ३ जून १९९४ तसेच शासन निर्णय क्र.सीबीसी/१०९४/पीके/८६/एमअेव्हीअेके९ दि. १६.०६.१९९४ अन्वये ठरविलेल्या नियमानुसार केली जाईल, तसेच शासन क्र.अेजीयु–२१९५/ सीआर–७३/१९–अे दि. ०३.०१.२००१ नुसार निम्न कृषि शिक्षणाअंतर्गत येणा–या विविध अभ्यासक्रमाच्या (पदविपूर्व) प्रवेशासाठी खाली दर्शविलेल्या प्रत्येक प्रवर्गात ३० टक्के जागा विद्यार्थीनींसाठी आरक्षित असून त्यावर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. तसेच शासन निर्णय क्र. सी.बी.सी. १०/२००६ प्र.क्र. १५/मावक–५, दिनांक ५ जून २००६ अन्वये अनुसुचीत जाती व अनुसूचीत जमाती सोडून विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार सक्षम अधिका–याचे दिनांक ०१.०४.२०१२ नंतरचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहील्यास, त्या जागेवर शासन निर्णय क्र. टी. ई.एम.–३३९७/१२९२६/(९०८६) टी.ई–I दि. ११.०७.१९९७ नुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत विशेष मागासवर्गीय (SBC) उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. तसेच रिक्त जागांवर विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागा वरील शासन निर्णयानुसार इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात येतील.

### संवैधानिक आरक्षण ➧

**अ)** कृषि तंत्र विद्यालय, धारणी सोडून इतर सर्व विद्यालयांकरीता/निकेतनांकरीता

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तिसह) | :– | १३ टक्के |
| २) | अनुसुचित जमाती | :– | ७ टक्के |
| ३) | विमुक्त जाती (अ) (व्ही.जे/डी.टी–अे) | :– | ३ टक्के |
| ४) | भटक्या जमाती (ब) (जानेवारी ९० पूर्वीच्या २८ तत्सम जमाती) | :– | २.५ टक्के |
| ५) | भटक्या जमाती (क) | :– | ३.५ टक्के |
| ६) | भटक्या जमाती (ड) | :– | २ टक्के |
| ७) | इतर मागासवर्गीय जाती (ओ.बी.सी.) | :– | १९ टक्के |
| | एकूण | | ५० टक्के |

(संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी)

**ब)** कार्यकारी परिषद, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला विषय क्र. ३०/२०११ द्वारे दि. २२ ऑगष्ट, २०११ रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कृषि तंत्र विद्यालय, धारणी करीता.

(मेळघाट मधील धारणी व चिखलदरा तालुक्यातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा तेथील ७/१२ चा उतारा असण्याऱ्या किंवा तेथील १० वी पास झालेल्या उमेदवारांसाठी)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तिसह) | :– | २.६ टक्के |
| २) | अनुसुचित जमाती | :– | ८० टक्के |
| ३) | विमुक्त जाती (अ) (व्ही.जे/डी.टी–अे) | :– | ०.६ टक्के |
| ४) | भटक्या जमाती (ब) (जानेवारी ९० पूर्वीच्या २८ तत्सम जमाती) | :– | ०.५ टक्के |
| ५) | भटक्या जमाती (क) | :– | ०.७ टक्के |
| ६) | भटक्या जमाती (ड) | :– | ०.४ टक्के |
| ७) | इतर मागासवर्गीय जाती (ओ.बी.सी.) | :– | ३.८ टक्के |
| | एकूण | | ८८.६ टक्के |
| | खुला प्रवर्ग | :– | ११.४ टक्के |

**इतर आरक्षण ➧**

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | शेतकरी/शेतमजूरांची मुले (अे.जी.) | :– | ६ टक्के |
| ९) | आजी व माजी सैनिकांची मुले/मुली (डी.पी.) | :– | २ टक्के |
| १०) | प्रकल्पग्रस्तांची मुले (पी.डी.) (प्रकल्पग्रस्त कायदा १९७६ नुसार) | :– | ४ टक्के |
| ११) | स्वातंत्र्य सैनिकांची मुले (एफ.एफ) | :– | २ टक्के |
| १२) | अपंग उमेदवार (पी.एच.) | :– | ३ टक्के |
| १३) | महिला | :– | ३० टक्के |

**टिप ➧**

१) इतर मागासवर्गिय जाती (OBC), विमुक्त जाती–(अ) (VJ/DT-A), भटक्या जमाती–(ब) (NT-B), भटक्या जमाती–(क) (NT-C), भटक्या जमाती–(ड) (NT-D) व विशेष मागासवर्गीय (SBC) ह्या वर्गवारीसाठी उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) जोडणे आवश्यक आहे. उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर) १ एप्रिल २०१३ नंतरचे असावे.

२) शेतकरी म्हणजे ज्याची स्वतःची/कुळाची शेती असून ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन फक्त शेतीच आहे. तसेच शेतमजूरी करणारे म्हणजे ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन मजुरी आहे अशी व्यक्ती, त्यासाठी सक्षम अधिका–याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३) राखीव संवर्गाच्या उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश घेतल्यापासून सहा महिन्याच्या आत प्रवेश घेतलेल्या कृषि तंत्र निकेतनात सादर करणे आवश्यक आहे. राखीव जागेवर प्रवेश घेणा–या उमेदवारांनी नॉन–क्रिमीलेअर (non-creamlayer) प्रमाणपत्र प्रवेश घेतेवेळी सादर करणे आवश्यक आहे. तथापि, प्रवेश अर्जासोबत नॉन– क्रिमीलेअर (non-creamlayer) प्रमाणपत्र मिळाले नसल्यास सेतुमध्ये प्रस्ताव सादर केल्याची पावती ग्राह्य धरण्यात येईल.

४) अनुसूचीत जाती व जमाती सोडून इतर सर्व आरक्षित प्रवर्गांला (खुला प्रवर्ग महिलांसह) दिनांक ०१.०४.२०१३ नंतरचे सक्षम अधिका–याचे उन्नत व प्रगत गटाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) एस.सी. व एस.टी. संवर्ग सोडून सर्व आरक्षित प्रवर्गासाठी नॉन–क्रिमीलेअर (non-creamlayer) प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच ३० टक्के महिला आरक्षणासाठी नॉन–क्रिमीलेअर (non-creamlayer) असणे आवश्यक आहे.

६) विशेष मागास प्रवर्ग (SBC) साठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली नाही. परंतु गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या जागेवर एकुण प्रवेशक्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

७) शासन निर्णय क्र. बीसीसी १०९१/२५५१/(क) १६ ब, दिनांक २६ मार्च १९९१ अन्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती (ब, क व ड) परिच्छेद क्र. ३.७ (अ) व (ब) (१) ते (६) प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, ही पदे अदलाबदलीने भरण्यात येतील.

८) जर उमेदवार एका पेक्षा जास्त राखीव प्रवर्गात हक्क सांगत असेल, तर त्याची राखीव जागेची वर्गवारी क्रमवार (Sequence) विचारात घेण्यात येतील.

९) आरक्षणाबाबतचे वरील नियम, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार केलेले बदल व सुधारणा विचारात घेऊन लागू करण्यात येतील.

१०) परिच्छेद क्र. ३.७ इतर आरक्षण (८) ते (१३) मधील वर्गवारीच्या उमेदवाराची टक्केवारी ही गुणवत्ता यादीतील उमेदवारास जमेस धरुन राहील.

११) ६ टक्के आरक्षणासाठी तहसीलदार/नायब तहसीलदार यांचे शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक असून त्याचे उपजिवीकेचे साधन शेती हे असावे.

१२) आजी–माजी सैनिक प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराने पालकाचे संबंधीत खात्याचे नोकरीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत अर्जासोबत जोडावी.

१३) परिच्छेद ३.७ इतर आरक्षण (१०) नुसार प्रकल्पग्रस्तांच्या जागा भरतांना पुर्नवसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. या सवलतीचा फायदा मिळण्याकरीता त्यात विद्यार्थ्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१४) परिच्छेद क्र. ३.७ इतर आरक्षण (११) नुसार स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकांचा मुलगा/मुलगी किंवा मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी यांना खालील अटींच्या अधिन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील मुद्यांवरील रू. १००/– चे स्टॅपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल (या शपथपत्रात स्वातंत्र्य सैनिकाने उमेदवाराशी असलेले स्वतःचे नाते उमेदवाराच्या नामनिर्देशासह स्पष्टपणे नमूद केलेले असावे).

   १) उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.

   २) स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.

   ३) स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग आता केला तर, यापुढे कुठल्याही नातेवाईकासाठी करणार नाही.

१५) अपंग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरावे.

१६) शासन निर्णय क्र. अेजीयु–२१९५/सीआर–७३/१९–अे दिनांक ३ जानेवारी २००१ नुसार एकुण जागांच्या तीस टक्के जागा प्रत्येक संवर्गात महिला उमेदवारांसाठी आरक्षित आहेत.

१७) प्रत्येक उमेदवाराच्या अर्जाचा सर्वप्रथम विचार त्यांच्या गुणवत्तेवर (On Merit) केल्या जाईल.

## ३.८ सुचना/सवलती ➧

१) संस्था/विद्यापीठातर्फे कोणतेही विद्यावेतन दिल्या जाणार नाही.

२) जागा उपलब्ध असल्यास वर्गवारी व गुणवत्तेनुसार वसतीगृहात राहण्याची व्यवस्था करण्यात येईल. मुलीकरीता वसतीगृह उपलब्ध नसल्यामुळे निवासाची व्यवस्था मुलींनी स्वतः करावी.

३) संस्था/विद्यापीठातर्फे गणवेश दिल्या जाणार नाही. तरी पण प्रत्येक विद्यार्थ्यास डार्क ब्राउन पॅन्ट व ऑफ पांढरा शर्ट आणि विद्यार्थीनिस ऑफ पांढरा रंगाची साडी/ब्लाऊज/कुर्ता आणि डार्क ब्राउन सलवार/ओढणी (कार्यकारी परिषद, डॉ. पं.दे. कृ.वि., अकोला ठराव क्र.: निकृशि विद्याशाखा/०२/२०१२ द्वारे दि. ०७ जानेवारी, २०१२ रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे) स्वखर्चाने विकत घ्यावा/घ्यावी लागेल व गणवेश दररोज घालणे आवश्यक राहील.

४) निम्न कृषि शिक्षणअंतर्गत विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना सर्व विद्यालयांच्या/निकेतनांच्या सोईकरीता दिवाळी सणा निमित्य आठ दिवसाची सुटी राहील. हि सुटी दिवाळीचे (लक्ष्मीपूजन) दोन दिवस अगोदर पासून सुरु होईल.

## ३.९ वसतीगृह व्यवस्था ➧

विद्यापीठाने वसतीगृहाची व्यवस्था प्रत्येक घटक कृषि तंत्र विद्यालयात केलेली आहे. फक्त कृषि तंत्र विद्यालय, मुल–मारोडा येथे वसतीगृहाची सोय नाही. इतर सर्व घटक कृषि तंत्र विद्यालयांमध्ये जागा उपलब्ध असल्यामुळे वसतीगृहात प्रवेश वर्गवारी व गुणवत्तेनुसार देण्यात येईल. वसतीगृहाची सर्व व्यवस्था रेक्टरकडे राहील. रेक्टर हे प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय यांचे देखरेखीखाली काम करतील. सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे/निकेतनाचे व वसतीगृहाचे नियम कटाक्षाने पाळावे लागतील. जे विद्यार्थी वसतीगृहात किंवा विद्यालयसत/निकेतनात नियमबाह्य वर्तणूक करतील त्यांना निकेतनातून किंवा वसतीगृहातून काढून टाकण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. मान्यताप्राप्त विना अनुदानित खाजगी निकेतनातसुध्दा वसतीगृहाची व्यवस्था करण्याचे प्रयत्न करतील.

## ३.१० नियमावली व अटी ➧

विद्यापीठाने वेळोवेळी केलेले सर्व नियम विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील. विद्यालयात/निकेतनात किंवा विद्यालयाबाहेर/निकेतनाबाहेर देखील विद्यापीठाची प्रतिमा डागाळणार नाही याची दक्षता प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली पाहीजे. पालकांनी देखील आपल्या पाल्यावर लक्ष ठेऊन वेळोवेळी तो विद्यालयाचे/निकेतनाचे नियम व विद्यालयाची/निकेतनाची शिस्त पाळतो किंवा नाही याची काळजी घ्यावी. जे विद्यार्थी विद्यापीठाच्या विद्यालयाचे/निकेतनाचे नियम व विद्यालयाची/निकेतनाची शिस्त पाळणार नाहीत, अशा विद्यार्थ्यावर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कडक कारवाई करण्यात येईल. शिक्षेस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे काढून टाकण्यात येईल.

**महत्वाचे नियम ➧**

१) प्रवेश मिळाल्यास विद्यार्थ्यास वसतीगृहात निवास व भोजन करावे लागेल.

२) भोजनाचा खर्च विद्यार्थ्यांना स्वतः करावा लागेल.

३) सर्व विद्यार्थ्यांना निकेतनाच्या वेळात विहित गणवेशच घालावा लागेल.

४) सर्व विद्यार्थांना विद्यालयाने/निकेतनाने व विद्यापीठाने वेळोवेळी अंमलात आणलेले नियम पाळावे लागतील.

५) खोटे प्रमाणपत्र अथवा माहीती देऊन प्रवेश प्राप्त केला आहे, असे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

६) शैक्षणीक शुल्कात कोणताही बदल झाल्यास, तो विद्यार्थ्यास/पालकास बंधनकारक राहील.

**३.११ शैक्षणीक तपशिल ➧**

अभ्यासक्रम बौध्दीक व प्रात्यक्षीकाव्दारे पुर्ण करण्यात येईल. बौध्दीक व प्रात्यक्षीके यांच्या वेगवेगळया परिक्षा होतील. दोन्ही पैकी एखाद्या भागात विद्यार्थी नापास/गैरहजर असेल तर बौध्दीक आणि प्रात्यक्षीक या दोन्हीचीही परत परिक्षा द्यावी लागेल.

**३.१२ हजेरी ➧**

साधारणपणे विद्यार्थी प्रत्येक विषयाच्या तासाला हजर राहणे आवश्यक आहे. परंतु काही अपरिहार्य कारणाने गैरहजेरी संभवते तशाही परिस्थितीत वर्गातील/ प्रात्यक्षीकातील किमान हजेरी ८५ टक्के असणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्याला परिक्षेत बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**३.१३ समसमान गुण असल्यास गुणवत्ता ठरविण्याबाबत ➧**

जर एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या शालांत परिक्षेच्या गुणांची टक्केवारी व एकूण अधिभार गुणांक मिळवून एकूण गुणांची टक्केवारी सारखीच असल्यास, अशा उमेदवारांची गुणवत्ता या विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या विनियम क्रमांक एसी/१० च्या परिच्छेद क्रंमाक ९ (जी) नुसार ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.

१) इयत्ता १० वी शालान्त परीक्षेतील उच्चतम गुणांची टक्केवारी.

२) कमीत कमी प्रयत्नांमध्ये इयत्ता १० वी शालान्त परीक्षा उत्तीर्ण.

३) वयाने लहान असलेला उमेदवार.

**३.१४ अर्जदारासाठी आवश्यक सुचना ➧**

१) अर्जदाराने केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तिका व अर्ज पुर्ण वाचल्यानंतरच अर्ज भरावा.

२) अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच एकदा अर्ज भरल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही. तसेच अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीविषयीचे कागद पुरावे प्रवेशाच्या तारखेला सादर करावे लागतील. आवश्यक कागद पुरावे न पुरविल्यास संबंधीत प्रवेश रद्द करण्यात येईल.

३) अर्जामध्ये खोटी माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा खोटे प्रमाणपत्र किंवा माहीती देवून प्रवेश प्राप्त केला आहे असे निदर्शनास आल्यास किंवा कृषि तंत्र निकेतनात प्रवेश झाल्यानंतर इतर कोणत्याही संस्थेत प्रवेश घेतलेला आहे असे आढळल्यास त्या विद्यार्थ्याचा प्रवेश केंव्हाही रद्द करण्यात येईल.

४) दउशालांत परिक्षेतील गुणांच्या टक्केवारीमध्ये खालील प्रमाणे जास्तीचा गुणांकाचा अधिभार मिळेल.

| | | |
|---|---|---|
| १) | एस.एस.सी – १० वी सर्वात चांगले पाच विषयाचे गुण (शालांत परिक्षा किती उपक्रमात पुर्ण केले त्यानुसार जास्तीच्या प्रत्येक प्रयत्नास एक गुणांक कमी केला जाईल) | शेकडा गुण |
| २) | उमेदरावाचे आई/वडील शेत जमीनधारक (७/१२ धारक) असल्यास किंवा शेतमजूर असल्यास तहसीलदार यांचा दाखला जोडणे आवश्यक आहे. | १२ टक्के |
| ३) | उमेदवाराची आई/वडील राज्यातील कृषि विद्यापीठामध्ये सेवेत/सेवानिवृत्त/मृत असल्यास | ३ टक्के |
| ४) | इय्यत्ता ८ वी ते १० वीच्या वर्गात क्रिडा अथवा सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास | २ टक्के |
| ५) | एन.सी.सी., एम.सी.सी. किंवा स्काउट मध्ये भाग घेतला असल्यास | २ टक्के |

५) i) ७/१२ चा उतारा सन २०१२ किंवा २०१३ या वर्षाचा असावा. ७/१२ चा उतारा स्वतः/आई/वडील/आजी/आजोबा (वडीलांचे आई वडील) त्यांच्या नावाचा असावा. जर आई व वडील हयात नसतील तर ७/१२ चा उतारा भाऊ किंवा काकांच्या नावाचा असावा. पण त्यासोबत स्टॅम्प पेपरवर शपथ पत्र (Affidavit) व मृत्यु प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मृत्यु प्रमाणपत्र हे सक्षम अधिकारी यांनीच प्रमाणित केलेले असावे. तसेच दत्तकपत्र ७/१२ साठी ग्राहय धरण्यात यावे. ७/१२ साठी क्षेत्राची मर्यादा नसून फक्त ते लागवडीखाली असणे आवश्यक आहे.

ii) उमेदवाराच्या आईने तिच्या वडीलांकडील जमीनीचा वाटा असल्याबाबतचे रु. २०/– च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र सादर केल्यास, असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास तो पात्र राहील.

६) भूमीहीन शेतमजूर प्रमाणपत्राचा अधिभार मिळण्यासाठी तहसीदलार/नायब तहसीलदार यांचे आई/वडिलांच्या नावाचे प्रमाणपत्र जोडावे. केवळ भूमीहीन असल्याचे प्रमाणपत्र १२ टक्के अधिभारासाठी ग्राह्य धरू नये. भूमीहीन शेतमजूर असा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे व मजूरी हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असावे. तसेच तलाठी यांनी दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरू नये.

७) उमेदवाराचे आई/वडील, कृषि परिषद/कृषि विद्यापीठाचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास, संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

८) क्रिडा/सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास (इयत्ता ८ ते १० वी) जिल्हा क्रिडा अधिकारी/क्रिडा परिषद/जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी उमेदवाराने तालुका/जिल्हास्तरिय, राज्य/देश पातळीवर क्रिडा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा या कार्यक्रमात भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र पदविका

अभ्यासक्रमासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

९) एन.सी.सी./एम.सी.सी./स्काऊट/गाईड प्रमाणपत्राच्या २ टक्के अधिभारासाठी (इयत्ता ८ ते १० वी पर्यंतचे) मुख्याध्यापक/तालुका समादेशक व जिल्हा समादेशकाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरावे.

१०) उमेदवाराने सादर करावयाचे एम.सी.सी. चे प्रमाणपत्र जिल्हा समादेशक/जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीचे असणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याचा अधिभार मिळणार नाही. तथापी मा. सचिव, म.रा.मा. व ऊ. मा. शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. रा.प. /पा.पु.अ./महाराष्ट्र छात्र सेना/८२९७, दिनांक ०१.१२.२००१ नुसार विहीत नमुन्यातील मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

११) आर्थिकदृष्टया मागास वर्गातील उमेदवारांनी संबंधीत तहसीलदारांकडील दिनांक १ जानेवारी २०१३ रोजी किंवा त्यानंतर दिलेले आर्थिक मागास वर्गाचे प्रमाणपत्राची सांक्षांकीत प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच मुळ प्रमाणपत्र प्रवेशाच्या वेळी सादर करावे.

(सदर ची तरतूद फक्त केंद्रीय प्रवेश पध्दतीने विना अनुदानित कृषि तंत्र निकेतनात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांनाच लागू राहील.)

१२) कुठल्याही परिस्थितीत दुय्यम (Duplicate) दाखल्यावर प्रवेश दिल्या जाणार नाही, काही अपवादात्मक परिस्थितीत दुय्यम प्रत विचारात घेतली जाईल. तथापी त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

   १) शाळा सोडल्याचा दाखला हरवला असल्यास रु. २०/– चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

   २) मुळ दाखला हरवल्या बाबतची विभागीय वर्तमान पत्रातून प्रकाशित केलेली जाहिरात प्रकाशकाची प्रत सादर करावी.

   ३) मुळ शाळा सोडल्याचा दाखला हरवल्या बाबतची पोलीसात नोंदविलेल्या तक्रारीची प्रत सादर करावी.

१३) प्रवेश घेतांना सर्व मुळ प्रमाणपत्रे, मुख्यत्वे शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रिका सादर करावी लागेल. त्याशिवाय शुल्क स्विकारल्या जाणार नाही व प्रवेश रद्द करण्यात येईल.

१४) अर्जदाराने तात्पुरती गुणवत्ता यादी स्वतः विद्यापीठाच्या संकेतस्थळावर किंवा संबंधित जिल्ह्याच्या कृषि तंत्र विद्यालयात जावून पहावी. संबंधीत संस्थेतर्फे/विद्यापीठातर्फे कोणतीही सुचना पोष्टाने कळविण्यात येणार नाही.

१५) अर्जदाराने शालांत परिक्षेनंतर इतर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल तर त्या संस्थेचा विद्यार्थी असल्याचे प्रमाणपत्र (Bonafide Certificate) सादर करता येईल. **परंतु प्रवेश घेतल्यानंतर पाच दिवसाचे आंत सदर निकेतनाला/संस्थेला दाखले सादर करणे आवश्यक राहील. सादर न केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.** वरील मुदतीमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्याकडून दाखले प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत कृषि तंत्र

निकेतनाच्या प्राचार्याची राहील. अर्जदाराचे शिक्षणात खंड पडला असल्यास त्याबाबतचे दंडाधिका–याचे समक्ष प्रतिज्ञा केल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१६) राखीव जागेची वर्गवारी मिळण्यासाठी सक्षम अधिका–याचा जातीचा दाखला प्रवेश घेतेवेळी सादर करणे आवश्यक आहे. राखीव जागांची माहिती अनु. क्र. २.० मध्ये माहीती पुस्तीकेत दिली आहे.

१७) प्रवेश प्रणाली कालावधीत प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने नियम बाह्य कृत्ये व बाह्य हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास प्रवेश प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१८) प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने ठरलेल्या वेळेच्या आत संबंधीत जिल्ह्याच्या घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा आल्यास प्रवेश मिळणार नाही व उशिरा येण्याबाबतच्या कोणत्याही सबबीचा/कारणांचा विचार केला जाणार नाही. (उदा. पाऊस होता, पूर होता, बस उशिरा आली, बस वेळेवर मिळाली नाही, आजारी होतो, पैशाची सोय नव्हती, यादी केंव्हा लागणार हे माहीत नव्हते इ.). तसेच याबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही व पत्रव्यवहारही केला जाणार नाही.

१९) अर्जदाराचे वय १७ जुन २०१३ रोजी १४ वर्षापेक्षा कमी किंवा ३० वर्षापेक्षा जास्त आणि उमेदवार माजी सैनिक असल्यास १४ वर्षापेक्षा कमी किंवा ४५ वर्षापेक्षा जास्त असल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

२०) वरील नियम/सूचना इ. बाबीचा या विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या विनियम क्र. एसी/१० व महाराष्ट्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन अर्थ लावण्यात येईल.

२१) कुठल्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणुक हा रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षा पात्र गुन्हा ठरतो. रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४×७ रॅगिंगविरोधी कायदा मदत मिळणेसाठी १८००–१८०–५५२२ या क्रमांकावर संपर्क साधावा. ई–मेल : helpline@antiragging.net आणि संकेतस्थळ : http://www.ugc.ac.in. प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई–वडील/ पालक यांनी रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ चे आम्ही पालन करू असे प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणुक चांगली ठेऊ अशी खात्री देणे गरजेचे आहे.

२२) **एकदा प्रवेश घेतल्यानंतर कृषि तंत्र विद्यालय/निकेतन बदलता येणार नाही.**

२३) प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतीम राहील.

# ४. कृषि तंत्र पदविका/कृषि तंत्र निकेतन पदविका अभ्यासक्रम शैक्षणीक सत्र सन २०१३-२०१४ चे प्रवेश प्रणाली वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | केंद्रिय प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तिका व अर्ज विक्री सुरू होण्याची दिनांक | १७.०६.२०१३ |
| २. | अर्ज विक्री व ऑन–लाईन अर्ज भरणेची अंतीम दिनांक | ०८.०७.२०१३ |
| ३. | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | १८.०७.२०१३ |
| ४. | तक्रार अर्ज स्विकृतीची अंतिम दिनांक | २३.०७.२०१३ |
| ५. | तक्रार निवारण समितीची बैठक | २४.०७.२०१३ |
| ६. | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | २६.०७.२०१३ |
| ७. | जिल्हानिहाय व विद्यालय/निकेतन निहाय पहिली प्रवेश यादी प्रसिध्द करणे | २७.०७.२०१३ |
| ८. | प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीचा कालावधी | २९.०७.२०१३ ते ३१.०७.२०१३ |
| ९. | प्रवेश प्रक्रियेच्या दुस–या फेरीचा कालावधी | ०५.०८.२०१३ ते ०७.०८.२०१३ |
| १०. | प्रवेश प्रक्रियेच्या तिस–या फेरीचा कालावधी | १२.०८.२०१३ ते १४.०८.२०१३ |
| ११. | प्रवेश प्रक्रिया राबविणा–या घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयांत आपापल्या कार्यक्षेत्रांतील कृषि तंत्र विद्यालय/निकेतन करीता स्थळ प्रवेश (Spot Admission) फेरीचा कालावधी | १९.०८.२०१३ ते २१.०८.२०१३ |
| १२. | शैक्षणिक सत्र सुरू होण्याची दिनांक | १६.०८.२०१३ |
| १३. | स्थळ प्रवेश (Spot Admission) फेरी संपल्यानंतर सुध्दा काही कारणास्तव जागा रिक्त झाल्यास मज्ञामच्या विद्यापिठनिहाय अंतिम गुणवत्ता यादीतील सर्वसामान्य गुणवत्ता या एकाच निकषान्वये जिल्हयाचे किंवा कुठल्याही आरक्षाणाचे बंधन न घालता प्रवेश प्रक्रिया राबविणारे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालये आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि तंत्र विद्यालयांच्या व निकेतनांच्या प्रवेशाकरिता विद्यापिठस्तरिय अंतिम प्रवेश फेरीचा कालावधी. | ११.०९.२०१३ |

*टिप : वरील नमुद तारखांना सुटी असली/जाहिर झाली तरी संबंधीत कार्यालये सकाळी १० ते ५ पर्यंत नेहमीप्रमाणे सुरु राहतील.*